# ''या कठीण समयी देवावर विश्वास ठेवणे''

**कोरोनामुळे निर्माण झालेल्या संकटाच्या परिणामांवर मुख्य प्रेषित जॉन लूक श्नायडर यांची मुलाखत**

*झुरीच. सध्याच्या दिवसांत प्रत्येकाच्या मनात जो विषय आहे तो म्हणजे कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या साथीच्या रोगाचा फैलाव. प्रत्येक दिवस, अहवालाद्वारे आम्हासाठी अधिक वाईट बातमी घेवून येत आहे. याविषयी न्यू अपोस्टॉलिक चर्चचे मुख्य प्रेषित यांना काय सांगायचे आहे? ते त्यांच्या बंधू आणि भगिनींना हे आवाहन करीत आहेत की त्यांनी देवावर भरवसां ठेवावा.*

**मुख्य प्रेषित श्नायडर, कोरोनामुळे निर्माण झालेल्या संकटामुळे संपूर्ण जगभरात लोकांना श्वास रोखून धरावा लागत आहे. आजतागायत, सर्व खंडामधील पुष्कळ लोकांना याची लागण झालेली आहे किंवा काही जणांचा मृत्यू देखील झालेला आहे. तुम्ही त्यांना सांत्वनपर काय संदेश द्याल?**

मी या संकटास खुप गांभीर्याने घेत आहे. जागतिक अनुमानानुसार, ११,४०० लोक कोरोना व्हायरसमुळे अगोदरच मरण पावलेले आहेत, आणि अंदाजे २,७५,००० जणांना याची लागण झालेली आहे (२१ मार्च २०२० पर्यंत; ताजी आकडेवारी या ठिकाणी पहा: https://coronavirus.jhu.edu/map.html). आणि दुर्दैवाने आणखी लोकांना याची लागण होण्याची शक्यता आहे. जे लोक यामुळे प्रभावित झालेले आहेत त्यांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत, आणि त्यांच्यासाठी प्रार्थनेत आहोत! आम्ही त्या सर्व पहिल्या फळीमधील निष्ठावान जणांचे आभार मानतो की ज्यांनी लोकांच्या मदतीसाठी स्वत:स वाहून घेतलेले आहे. हे पाहणे खरेच सुंदर आहे की किती लोक अशा परिस्थितीत इतरांच्या मदतीसाठी तयार आहेत.

विशेषत: ही अशी वेळ आहे ज्यामध्ये आम्ही आमच्या त्या सभासदांकडून शिकू शकतो की ज्यांना यापूर्वी भूतकाळात मोठा त्रास सहन करावा लागला आहे:

- माझ्या निर्धारीत योजनांनुसार, पुढील आठवड्यात मी इंडोनेशिया या ठिकाणी असायला पाहिजे होते. त्या देशामध्ये दोन भूकंपाच्या दरम्यानच्या काळात २५०० पेक्षा जास्त लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या बेटांच्या रहिवाशांकडे त्या अदृश्य धोक्यांपासून स्वत:चे रक्षण करण्याच्या कोणताही मार्ग नव्हता.

- मी कधीकधी थोडी नाराजी व्यक्त करतो कारण फ्रान्समधील संचारबंदीमुळे मला घरी थांबावे लागत आहे. अफ्रिकेमध्ये शेकडो हजारो लोक आहेत की जे निर्वासितांच्या छावण्यांमध्ये राहत आहेत--ज्यामध्ये आपल्या पुष्कळ सभासदांचा देखील समावेश आहे--जेथे त्यांना देखील थोडे किंवा बहुत कोंडून ठेवण्यात आलेले आहे.

- दुर्दैवाने कोरोनाच्या संकटामुळे बऱ्याच ठिकाणी नाट्यमय आर्थिक परिणाम देखिल होतील. आणि नेहमी प्रमाणे ह्यामुळे सर्व प्रथम ते प्रभावित होतील की ज्यांच्याकडे अगोदरच फार थोडेसे आहे. याचीच मला खुप काळजी वाटते! इथे मी मदत करु शकत नाही, पण कसाई या भागातील (लोकशाही प्रजासत्ताक कँगो) ७५००० सभासदांचा विचार करा की, ज्यांनी सर्वकाही गमावलेले आहे--अगदी सर्व काही--२०१७ साली केवळ एका आठवड्यात, आणि ज्यांना दुसऱ्या देशात किंवा जंगलात पळून जावे लागले.

- होय, हे खरे आहे की आम्ही डिव्हाईन सर्व्हिससाठी एकत्र येवू शकत नाही. हे वेदनादायक आहे. आत्ता येथेही, मी विचार करतो की काही आठवड्यांपूर्वी मी जेव्हा पश्चिम अफ्रिकेमध्ये होतो. तेथील ख्रिस्ती लोकांना केवळ यामुळे ठार केले गेले की ते डिव्हाईन सर्व्हिसला उपस्थित राहीले.

- आणि मला आमच्या त्या बंधूंची देखील आठवण होते आहे--जे रशियामध्ये आहेत किंवा पॅसिफिक मधील दूरवर असणाऱ्या बेटांवर आहेत--की ज्यांना व्यवस्थितपणे पवित्र प्रभूभोजनाच्या साजरीकरणासह होणाऱ्या डिव्हाईन सर्व्हिसेसचा आनंद काही आठवडे किंवा कदाचित काही महिनेच घेता येतो.

© New Apostolic Church International

कोरोनाच्या या संकटास कमी लेखावे यासाठी मी हे म्हणत नाही. या उलट: मला आपल्याला फक्त हे आवाहन करायचे आहे की, ह्या प्रकारच्या देशांमध्ये अशा परीस्थितीत राहणाऱ्या बंधू आणि भगिनींकडून आपण शिकावे. या सर्व आव्हानांना न जुमानता ते इतके खंबीर कसे काय राहीले आहेत? कारण ते ख्रिस्तामध्ये खोलवर मुळावलेले आहेत. त्यांची प्रभूकरीता असणारी प्रिती––हे त्याचे रहस्य आहे! आज जो कठिण समय आम्ही अनुभवत आहोत, त्यात आम्हाला याची जाणीव झाली आहे, की मागील काही आठवड्यात ज्या वेगवेगळ्या गोष्टींनी आम्हाला व्यापून टाकले होते किंवा ज्याचे ओझे आम्हावर होते त्या आम्हाला अचानक पूर्णपणे अनावश्यक वाटत आहेत. आता आमच्या मनात सर्वात जी महत्वाची गोष्ट आहे ती म्हणजे, ख्रिस्ताबरोबरचे आमचे नाते टिकवून ठेवणे!

चला आम्ही देवासाठी असणारी आमची प्रिती यात दृढ राहूया. देव त्याच्यावर प्रिती करणाऱ्यांना मदत करण्यासाठी नेहमी एक विशेष मार्ग तयार करेल. देवाचे अभिवचन अजूनही तसेच आहे: सर्व गोष्टी––कोरोनाचे संकट सुध्दा––देवावर प्रीती करणाऱ्यांच्या चांगल्यासाठी एकत्रितपणे कार्य करेल (पहा रोम ८: २८).

**तुम्हा स्वत:ला देखील या क्षणी प्रवास करण्याची परवानगी नाही. पुढील दोन आठवडे तुमच्यासाठी कश्या प्रकारचे असतील?**

अधिकारी मंडळाने आम्हावरती लादलेल्या मर्यादांमुळे, मला माझे १० एप्रिल पर्यंत नियोजित असणारे सर्व दौरे रद्द करावे लागलेत. त्यानंतर परिस्थिती कशी निवळेल, हे आत्ता सध्या कोणालाही माहीत नाही. त्यामुळे मला इतरां प्रमाणेच परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागणार आहे––मी धीर आणि आशा सोडलेली नाही: मला माहीत आहे की देव आम्हाबरोबर आहे आणि त्याच्या लेकरांना तो सोडून देणार नाही, विषेशत: कठिण प्रसंगामध्ये. फक्त धैर्य असू द्या: गोष्टी पुढे जातील.

**चर्चचे जीवन व्यवहारीकपणे ठप्प झाले आहे. डिव्हाईन सर्व्हिसेस होणे जवळजवळ शक्य नाही. तुम्ही आपल्या बंधू आणि भगिनींना काय सल्ला द्याल?**

घरी रहा आणि ह्या परिस्थितीचा चांगल्या प्रकारे उपयोग करा. जेथे कोठे शक्य आहे तेथे, जिल्हा प्रेषितांनी आपल्या सभासदांना प्रक्षेपणाद्वारे (ट्रान्समिशन) घरी डिव्हाईन सर्व्हिस मिळविण्याची व्यवस्था केली आहे. आम्हाला हे माहीत नाही की देवाने अशा परिस्थितीला कशी परवानगी दिली. पण मला याची खात्री आहे की, ही आध्यात्मिक अस्थिरतेची वेळ आम्हाला डिव्हाईन सर्व्हिसेस, सेवक आणि पवित्र प्रभूभोजन यांचे महत्व ओळखण्यास मदत करेल!

**आणि या केंद्रिय डिव्हाईन सर्व्हिसेस की ज्या प्रक्षेपीत केल्या जातील त्यामध्ये पवित्र प्रभूभोजनाचे साजरीकरण केले जाणार नाही?**

होय हे खरे आहे. या डिव्हाईन सर्व्हिसेस नेहमीच्या क्रमा प्रमाणेच होतील, फक्त ह्यात पवित्र प्रभूभोजन साजरे केले जाणार नाही. हे अयोग्य ठरेल की जर केवळ काहीच सभासद पवित्र प्रभूभोजन साजरे करु शकतील, जेव्हा की त्याच वेळेस डिव्हाईन सर्व्हिसमध्ये घरुन सहभागी होणाऱ्या इतर हजारोंना त्याच्या शिवाय सहभागी व्हावे लागेल.

**जसे आपण मृतांसाठीच्या डिव्हाईन सर्व्हिसमध्ये संस्कार साजरे करतो तसे आता करु शकत नाही का, की ज्यामध्ये दोन प्रतिनिधी इच्छुक जीवात्म्यांच्या वतीने वेफर्स स्विकारतात?**

मागील काही दिवसांत बऱ्याच बंधू आणि भगिनींनी ही गोष्ट आम्हाला सुचविली: अधिकारी हे दोन सेवकांना पवित्र प्रभूभोजन देतील की जे प्राप्त करणाऱ्याच्या वतीने ते स्विकारतील. सर्व गोष्टींची खातर जमा केल्यानंतर, आणि युरोपीय जिल्हा प्रेषितांबरोबर सल्ला मसलत केल्यानंतर––सरतेशेवटी, की जे सर्व प्रथम यामुळे प्रभावित झालेले आहेत––मी या सूचनेचे पालन न करण्याचा निर्णय घेतला.

**असे का?**

पवित्र प्रभूभोजन हा एक संस्कार आहे, ज्याचे तारणाविषयीचे परिणाम हे कॅटॅकिझ्ममध्ये स्पष्ट केलेले आहेत (न्यू अपोस्टॉलिक चर्चचे कॅटॅकिझ्म ८.२.२०). आमच्या वर्तमान गरजांना अनुरुप असे व्यवहारीकपणे त्याचे वितरण आम्ही सहजपणे बदलू शकत नाही. हा प्रेषितियत्वाच्या जबाबदारीचा एक भाग आहे––नेमकेपणाने मुख्य प्रेषितांच्या जबाबदारीतील––यासाठी की पवित्र प्रभूभोजनाचे पावित्र्यपण राखले जावे! निर्वतलेल्यांच्या दृष्टीने याचा विचार करता, आम्हाला याची खात्री पटली आहे की हे तारणाचे कृत्ये निर्वतेलेल्यांकरता दिले जावे आणि दिले गेलेच पाहिजे. हे करण्याचा एकच मार्ग आहे की जे जीवंतामधील आहेत त्यांना यामध्ये पलीकडील जीवात्म्यांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी समाविष्ट केले जावे. पण हा दृष्टीकोन जीवंतासाठी लागू केला जावू शकत नाही. आम्ही योग्यरीतीने प्राप्त केलेले ख्रिस्ताचे तेच शरीर खावे आणि तेच रक्त प्यावे की ज्या भाकरीचे याजकिय सेवाकांद्वारे पवित्रकरण केले जाते आणि त्यांच्याद्वारे तिचे वितरण केले जाते (पहा न्यू अपोस्टॉलिक श्रध्दासिध्दांत यातील सातवे कलम).

**आणि इतर कोणताही मार्ग नाही जसे की, आधीच पवित्रिकरण केलेले वेफर्स उपलब्ध करुन देणे?**

बरेच वर्षापासून आम्ही आपल्या चर्चमध्ये ह्या पध्दतीशी परिचित आहोत: सेवकांच्या अनुपस्थितीमध्येही विश्वासणारे आधीच पवित्रीकरण केलेले वेफर्स प्राप्त करण्याद्वारे पवित्र प्रभूभोजनाचे साजरीकरण करु शकत होते. उदाहरणार्थ, ही पद्धत त्यांच्यासाठी वापरली जात होती की ज्यांना याजकिय काळजीचे पत्र मिळायचे. तथापि, ही कृती एक अपवाद अशीच असावी. पूर्णपणे वैध अश्या पद्धतीने, त्यास याच्याशी बदलले जावू नये की जसे विश्वासणाऱ्यांच्या सहभागितेमध्ये पवित्र प्रभूभोजनाचे साजरीकरण केले जाते. हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की: पवित्र प्रभूभोजनाचे असे साजरीकरण की ज्यात एक विश्वासणारा त्याच्या घरी एखाद्या व्यक्तीला त्याच्या वतीने पवित्रिकरण केलेली भाकर स्विकारताना स्क्रिनवर पाहतो, याची तारणासाठीची परिणामकारता त्याप्रकारे नाही की, जशी पवित्र प्रभूभोजनाच्या वास्तविक साजरीकरणामध्ये आहे.

**तर आपण सभासदांना काय सुचविले आहे?**

मला माहित आहे की पुष्कळ सभासदांना ह्या साथीच्या रोगाचा फैलाव होण्याचे थांबेपर्यंत पवित्र प्रभूभोजनाशिवाय राहावे लागेल. मी त्यांच्या दु:खात सहभागी आहे, कारण, सरते शेवटी मलाही, त्यांच्यासारखेच संचार बंदीमुळे पुढील आदेशापर्यंत माझ्या घरापुरतेच मर्यादित राहवे लागणार आहे. तथापि, विषेशकरुन या त्रासदायक काळात, आम्ही देवावर भरवसां ठेवूया. आम्ही अशाप्रकारे देवावर भरवसां ठेवू--की त्याला नेहमी हे ठाऊक असते की जे त्याच्यावर प्रिती करतात त्यांना त्यांच्या तारणासाठी जे अपरिहार्य आहे ते कसे पुरवावे.

**मुख्य प्रेषित श्रायडर, या मुलाखतीकरीता धन्यवाद**

© New Apostolic Church International